सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,
E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

**प्रेस नोट क्र. २५** **दिनांक :- २४/०४/२०२४**

## गणेशपुरी पोलीस स्टेशन मध्ये दाखल असलेल्या गुन्हयांत मागील १७ वर्षा पासुन पाहिजे असलेल्या आरोपीतांस स्थानिक गुन्हे शाखेतील पाहिजे-फरारी पथका कडुन करण्यात आली अटक

आगामी लोकसभा निवडणुकीचे पार्श्वभुमीवर मा. श्री. डॉ. डी. एस स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली घाटे,अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांचेकडुन ठाणे ग्रामीण जिल्हयात दाखल असलेल्या वेग-वेगळया गुन्हयातील पाहीजे-फरारी आरोपीतांना अटक करणेकामी तसेच अवैध धंद्यावर कारवाईकामी स्थानिक गुन्हे शाखेचे पाहिजे-फरारी पथकाची स्थापना कराण्यात करण्यात येवुन, त्याबाबत पथका मार्गदर्शनपर सुचना देण्यात आल्या. त्यानुसार श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण जिल्हयातील पाहीजे व फरारी आरोपी तसेच अवैध धंद्या बाबत माहीती मिळवुन कारवाई करणेकामी त्यांना मार्गदर्शन केले.

मा. वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशा प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेच्या पाहिजे-फरारी पथकाने गोपनीय माहीती प्राप्त करुन गणेशपुरी पोलीस स्टेशन गु. रजि. क्र. I ०५/२००७ भादविसह कलम ३९५, ३३६, ४१२, १२० (ब), ४०० प्रमाणे दाखल गुन्हयांतील पाहिजे आरोपी नामे पाडुरंग अण्णाजी जाधव वय 57 वर्षे रा. आंबाडी गांव ता. भिवंडी जि. ठाणे यास त्यांचे राहत्या घरातुन ताब्यात घेवुन पुढील कायदेशिर कारवाई कामी गणेशपुरी पोलीस पोलीस स्टेशन यांचे ताब्यात दिले.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस स्वामी, श्रीमती डॉ. दिपाली घाटे, अधीक्षक पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी दिलेल्या आदेश व सुचना प्रमाणे श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण याचे मार्गदर्शनाखाली पोउपनिरी/सागर पाटील, पोहवा/२२३६ धनाजी कडव, पोहवा/३१२९ भगवान सोनवणे, पोशि/२०४५ रवि राय यांचे पथकाने कौशल्यपुर्ण उल्लेखनिय कामगीरी केलेली आहे.

*************************************************************************